सीएनआर क्रएमएचएसआय ०५०००५०६२०२३

## इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७/२०२३ मधील निशाणी ०६ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा अर्जदार यांनी सामनेवालांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये कलम २३ अन्वये अंतरीम पोटगीसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज गुणदोषांवर चालून निकाल होण्यास पुष्कळ कालावधी लागणारा आहे. परंतु, सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा मुलगा देवांग याच्या उदरनिर्वाहाची, राहाण्याची, शिक्षणाची व आरोग्याची कोणतीही योग्य सोय न केल्याने अर्जदार व देवांग यांच्यावर उपासमारीची वेळ येणारी आहे. सदरचा अर्ज गुणदोषांवर चालून निकाली होईपर्यंत अर्जदार हिचे अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य या कारणास्तव दरमहा रक्कम रुपये १५,०००/– (रक्कम रुपये पंधरा हजार मात्र) व देवांग याचे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या खातर सामनेवाला क्र. १ कडून रक्कम रुपये ७,०००/– (रक्कम रुपये सात हजार मात्र) असे एकूण मिळून दरमहा रक्कम रूपये २२,०००/– (रक्कम रुपये बावीस हजार मात्र) अर्जदार हिस देणेबाबत सामनेवाला क्र. १ यास जरुर तो आदेश व्हावा अशी विनंती अर्जदार यांनी केलेली आहे.

३. सदर अर्जावर सामनेवाला क्र. १ यांनी निशाणी ११ येथे म्हणणे देवून असे कथन केले आहे की सदर अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यापासून स्वत: मर्जीने वेगळी राहत असून ती सध्या तिच्या भावाकडे कुडाळ येथे राहते. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस कधीही कसल्याही प्रकारचा शारिरीक व मानसिक त्रास दिलेला नाही. याउलट, अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यास मानसिक व आर्थीक स्वरुपाचा त्रास दिलेला आहे. तरी देखील तो अर्जदार हिची जबाबदारी घेण्यास तयार आहे. तसेच अर्जदार ही जाणूनबुजून त्याला त्रास देण्यासाठी स्वत:च्या भावाकडे जावून राहिली आहे. सामनेवाला क्र. १ याच्याकडे त्याच्या वयस्कर आईची जबाबदारी आहे व तिच्या उतारवयात तिला देखील सामनेवाला क्र. १ यांची नितांत गरज आहे. त्याची अर्जदार हिच्या बरोबर एकत्रीत नांदण्याची इच्छा आहे. परंतु, अर्जदार जाणुनबुजून देवांग यास त्याच्यापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करीत आहे. देवांग हा देखील

सामनेवाला क्र. १ याच्यासोबत राहण्यास इच्छुक आहे. परंतु अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याच्याकडे मुलास राहण्यास मज्जाव करीत आहे. सामनेवाला क्र. १ हा मोलमजूरी करुन उदरनिर्वाह करतो. त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ याची अर्जदार हिला पोटगी देण्याची ऐपत नाही. तरी सामनेवाला क्र. १ हा अर्जदार व मुलगा देवांग याच्या बरोबर राहण्यास तयार आहे व त्यांचे योग्यतो पालनपोषण करण्यास तो तयार आहे.

४. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्यातर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. उभयपक्षकार यांच्या कथनावरून खालील वादप्रश्न मी माझ्या विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील माझे निष्कर्ष खालील प्रमाणे मांडत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी अर्जदार यांनी सिध्द केले आहे काय ? | होय. |
| २ | अर्जदार अंतरिम अर्थसहाय्य मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | होय. सदर दरमहा अर्जदार यांना रक्कम रुपये २०००/– व मुलगा देवांग याला रक्कम रुपये ३०००/– |
| ३ | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये कलम १२, १८, १९, २० व २२ अन्वये सामनेवाले यांच्याकडून होत असलेल्या शारिरीक, मानसिक, भावनिक छळाबाबत व कलम २३ प्रमाणे प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरी जावे लागते त्या महिलेच्या कमाईच्याअभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थीक मदत मिळावी जेणे करुन ती महिला कमीत कमी कायदेशीर लढाई लढू शकेल या हेतूने केलेली आहे.

६. प्रस्तुत अर्जाच्या कामी काही गोष्टी दोन्ही बाजूंनी नाकारलेल्या नाहीत. पहिली गोष्ट

ही की अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह झालेला आहे व दुसरी गोष्ट ही की त्यांना विवाह संबंधातून देवांग हा मुलगा आहे.

**<u>वादप्रश्न क्र. १ बाबत</u> : –**

**७.** अर्जदार व सामनेवाला यांच्या कथनांचे अवलोकन करता त्यांनी एकमेकांवर अनेक आरोप व प्रत्यारोप केल्याचे दिसून येते. मात्र अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांवर केलेले आरोप व प्रत्यारोप यावर त्या दोघांनाही पुराव्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही भाष्य करणे उचित होणार नाही. अर्जदाराने मुळ अर्जात तिच्यावर केलेल्या हिंसाचाराबाबतच्या प्रत्येक घटना तारखेनिशी नमूद केल्या आहेत. अर्जदारास शारिरीक व मानिसक त्रासाला सामोरी जावे लागले असे तिचे कथन आहे. अर्जदार याने सामनेवाला क्र. १ याच्यावर केलेले आरोप पाहता ते आरोप निश्चितच गंभीर स्वरुपाचे आहेत. कोणतीही स्त्री संयुक्तीक कारण नसताना तिच्या माहेरी राहते ही बाब संभाव्य वाटत नाही. तसेच भारतीय संस्कृतीचा विचार करता एखादी स्त्री आपल्या पतीविरुध्द अनावश्यक आरोप करीत नाही असे मानले जाते. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिला नांदायला घेवून जाण्याकरीता कोणतेही प्रयत्न केले असे सकृतदर्शनी दिसून येत नाही. सबब, अर्जदाराच्या अर्जातील घटनांचा विचार करता सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिचा स्वत:हून त्याग केला असे म्हणण्यास वाव आहे. प्रथमदर्शनी अर्जदार ही तिला होणाऱ्या त्रासामुळे वेगळी राहिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, वरील कारणांचा विचार करता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिचा कौटुंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे वादप्रश्न क्र. १ याचा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ बाबत</u> : –**

**८.** अर्जदार यांनी निशाणी ५ येथे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र दाखल केलेले आहे व त्यावरुन तिचे शिक्षण १२ वी पर्यंत असल्याचे दिसून येते व ती सामनेवाला क्र. १ याच्यापासून दि. १६/०२/२०२१ रोजीपासून विभक्त राहत आहे व तिचे इतर कोणत्याही न्यायालयात पोटगी बाबत प्रकरण चालू नाही. तसेच तिचे सध्याचे कोणतेही उत्पन्न नाही. अर्जदार याने मत्ता व दायित्व प्रमाणपत्रामध्ये सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न दरमहा ६०,०००/– असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याबाबत ठोस अशा स्वरुपाचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सामनेवाला

क्र. १ यांच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्यामुळे व अर्जदार यांचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही सामनेवाला क्र. १ याची असल्यामुळे अर्जदार सामनेवाला क्र. १ याच्याकडून किती पोटगी मिळण्यास पात्र आहे हे पाहणे महत्त्वाचे आहे. अर्जदार याच्या कथनाप्रमाणे अर्जदार व त्यांचा मुलगा यांची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याच्यावर असली तरी त्याच्या वयोवृध्द आईची जबाबदारी सामनेवाला क्र. १ याच्यावर आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याचे असणारे उत्पन्न व त्याच्यावर असणाऱ्या आर्थीक जबाबदाऱ्या विचारात घेता अर्जदार हिच्या गरजा तसेच सध्या जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती लक्षात घेता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये २०००/– अंतरिम पोटगी देणे योग्य ठरेल. तसेच त्यांचा मुलगा देवांग याचा असलेला शैक्षणिक व इतर गरजा लक्षात घेता सामनेवाला क्र. १ याने रक्कम रुपये ३०००/– अंतरिम पोटगी देणे उचित ठरले. सबब, मी वादप्रश्न क्र. २ यांचे निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. ३ बाबत</u> : –**

**९.** वादप्रश्न क्र. १ व २ यांच्या निष्कर्षान्वये प्रस्तुत अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना दरमहा रक्कम रु. २०००/– (रक्कम रुपये दोन हजार मात्र) व मुलगा देवांश याला दरमहा रक्कम रु. ३०००/–(रक्कम रुपये तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून द्यावेत.

३. अर्जदार हिने पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा. अर्ज निकाली होण्यास अर्जदार हिच्यामुळे विलंब होत असल्याचे दिसून आल्यास अंतरिम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

५. आदेशाची प्रत अर्जदार यांना मोफत देण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2024.11.12 18:55:21 +0530

दि. ०८/११/२०२४
वेंगुर्ला

(डी.वाय.रायरीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग वेंगुर्ला